परिशिष्ट - 1.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. 58 दिनांक. 03.10.2023

**इतिवृत**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 58 दि. 03.10.2023 रोजी दुपारी 02.30 ते 05.30 या वेळेत online व offline पद्धतीने घेण्यात आली. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष आणि बहिस्थ सदस्य online पद्धतीने उपस्थित होते.

01. प्रा. संजिवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
02. डॉ.भरतभाई जोशी, कुलगुरु, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
03. डॉ. अमृत भरवाड, वरिष्ठ प्राध्यापक, युनिव्हर्सिटी ऑफ गुजरात, अहमदाबाद.
04. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, प्राध्यापक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
05. डॉ. चेतना सोनकांबळे, प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.
06. डॉ. निशा वळवी, सहयोगी प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
07. डॉ. लतिका गायकवाड. सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा.
08. डॉ. चेतना कामळस्कर , संचालक, विज्ञान विद्याशाखा.
09. श्रीमती. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
10. डॉ. दयाराम डी. पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
11. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
12. डॉ. साधना तांदळे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
13. श्री. शिवानंद कहाळेकर, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
14. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा (सचिव )

काही वैयक्तिक अडचणीमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

- डॉ. संजय चाकणे, पुणे. ( विद्वत परिषद सदस्य )
- प्रा. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
- श्री. ज्ञानेश्वर जाधव, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार. CDS.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

**बैठक क्र. 58**

**इतिवृत**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची 2023 या वर्षातील द्वितीय बैठक क्र. 58 दि. 03.10.2023 रोजी दुपारी 2.30 ते 5.30 या वेळेत Online/Offline पध्दतीने आयोजित केली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे-

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 58. | **उपस्थित सदस्यांचे स्वागत** |
| 58. 1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 01**<br>**बैठक क्र. 57 च्या परिषदेचे इतिवृत्त मान्यता**<br>**(सहपत्र 1 )**<br><br>**निर्णय-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 57 इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| 58. 2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 02**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे<br>**(सहपत्र 2)**<br><br>**निर्णय-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 57 कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 58. 3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177/ 2023/ 03 (पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम)**<br>**(58.3.1) पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम श्रीमती कल्पना साळुंके यांच्या संशोधन कार्यास मुदतवाढ व संशोधन मार्गदर्शक बदलाबाबत.**<br>**टिपणी –**<br>श्रीमती कल्पना साळुंके ह्यांनी शिक्षणशास्त्र विद्याशाखेत विद्यावाचस्पती पीएच.डी शिक्षणशास्त्र 2015 मध्ये प्रवेश घेतलेला होता. प्रसृतीमुळे त्यांना निर्धारित वेळेत पीएच.डी शिक्षणक्रम पूर्ण करता आला नाही. त्यांनी मुदत वाढविण्याबाबत विद्यापीठाकडे विनंती केलेली होती. YCMOU PhD Ordinance 2014 मधील मुद्दा क्र. 5 मध्ये शिक्षणक्रमाचा कालावधी 5 वर्ष आणि Maximum Extension Period 1 वर्ष दिलेला आहे. नोंदणी कालावधी हा विद्यार्थ्याचा BUTR ला विषय मान्य झाल्यापासूनचा धरण्यात यावा असे 5.1 मध्ये नमूद केलेले आहे. दि. 24. एप्रिल 2018 संशोधन समितीपुढे त्यांच्या संशोधन विषयास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे पत्र त्यांना 09.07.2018 रोजी देण्यात आलेले आहे. मा. कुलगुरुंनी त्यांना 31.07.2024 पर्यंत मुदत वाढ देण्यास मान्यता दिलेली आहे. तसे संबधित विद्यार्थ्यानीला पत्र देण्यात आलेले आहे.<br>सदर विद्यार्थीनीस प्रा.विजया पाटील ह्या संशोधन मार्गदर्शक देण्यात आलेल्या होत्या. त्या मार्च 2023 मध्ये सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांनी श्रीमती कल्पना साळुंके ह्यांना संशोधन मार्गदर्शनास |

असमर्थता दर्शविली आहे. दि. 21.09.2023 DRC मध्ये संशोधन मार्गदर्शक बदलाबाबत विषय क्र. DRC/EDU 2023 /4 अन्वये मान्यता देण्यात आली. त्यामुळे त्यांच्यासाठी नविन संशोधन मार्गदर्शक डॉ. सुभाष सोनुने ह्यांच्या नावास मान्यता देण्यात आली. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र 3)**

**निर्णय –**

1.श्रीमती कल्पना साळुंके ह्यांचा विद्यावाचस्पती शिक्षणशास्त्र मुदतवाढ कालावधी दि. 31.07.2024 पर्यंत वाढवून देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

2. संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ. सुभाष सोनुने यांच्याकडे मार्गदर्शनासाठी देण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 03 (पीएच.डी दूर शिक्षण शिक्षणक्रम)**

**(58.3.2) पीएच.डी दूर शिक्षण शिक्षणक्रम श्री. प्रमोद शाक्य विषय बदल व उप मार्गदर्शक नेमणूकीबाबत..**

**टिपणी –**

UGC minimum standard and procedure for Award of M.Phil / PH.D Degree 2016 मध्ये मुद्द क्र. ६.४ मध्ये Co- Guide घेण्याबाबत मार्गदर्शन केलेले आहे.

YCMOU Research Oridinance २०१७ BOM Meeting ०७/०९/२०१७ Vide Resolution No. 164.3.3(IV) 2.2 मधील Research Supervisor कार्य Recognition बाबत.... मार्गदर्शन केलेले आहे.

श्री. प्रमोद शाक्य हे पीएच.डी दूर शिक्षण या क्षेत्रात करीत आहे. त्यांचा संशोधनाचा विषय बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यासंदर्भात आहे त्यांचे संशोधन मार्गदर्शन या क्षेत्रातील नाहीत म्हणून त्यांनी सहमार्गदर्शक देण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यांनी सहमार्गदर्शक म्हणून डॉ. सोनाली शंकवालकर, सहाय्यक प्राध्यापक गोवा यांचे नाव त्यांची संमती व बायोडाटा दिलेला होता त्यास तत्कालीन मा. कुलगुरूंनी दि. १५/०५/२०२२ रोजीच्या अंतर्गत संज्ञापन पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

सदर विद्यार्थ्यांने संशोधन विषय इंग्रजीतून होता त्यास दि. १९ ते २३ जुलै २०२१ DRC बैठकीत मान्य करण्यात आलेला होता. परंतु सदर विद्यार्थ्याने संशोधन विषय मराठीतून घेण्याबाबत दि.13.04.2023 चा विनंती अर्ज केलेला होता. DRC च्या तात्कालीन अध्यक्षांनी सदरच्या पत्रास मान्यता दिलेली आहे. दि. २१/०९/२०२३ रोजी झालेल्या DRC बैठकीत मराठीतील संशोधन विषय मान्य देण्यासाठी ठेवण्यात त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.**

१. श्री. प्रमोद शाक्य ह्यांना डॉ. सोनाली शंकवालकर ह्यांना सहमार्गदर्शक घेण्यास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.
२. संशोधन विषय मराठीतून घेण्यास आणि संशोधन कार्य मराठीतून करण्यास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संशोधक विषय मराठीत करण्यास मूळ विषय मराठीतील विषय:**

| मूळ विषय (इंग्रजी) | मराठीतील विषय |
|---|---|
| "Comparative study of Home Based Education Programs of Intellectual disables offered by different institutions in order to develop Home Based Model program for special education" | "विविध संस्थाद्वारे राबविलेल्या बौद्धिक अक्षम बालकांचे गृह आधारित शैक्षणिक कार्यक्रमांचा तुलनात्मक अभ्यास करून विशेष शिक्षणासाठी गृह आधारित प्रारूप विकसित करणे". |

(सहपत्र 4)

**निर्णय-**

श्री. प्रमोद शाक्य ह्यांना डॉ. सोनाली शंकवालकर ह्यांना सहमार्गदर्शक म्हणून घेण्यास मान्यता देण्यात आली. आणि संशोधन विषय मराठीत करण्यास मान्यता देण्यात आली.

58.4 **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 4 (एम.ए. शिक्षणशास्त्र)**

**एम.ए. शिक्षणशास्त्र संरचना, विविध अभ्यासक्रम कार्यवाही, प्रवेश पात्रता, संपर्कसत्र आयोजन, मूल्यमापन योजना आणि अभ्यासकेंद्र निहाय विद्यार्थी प्रवेश संख्या मान्यतेबाबत.**

**टिपणी –**

(58.4.1) **एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम संरचना:** विद्यापीठाच्या विद्वत परिषद २३ फेब्रुवारी २०२३ मध्ये विषय क्र. ६०.४.४ नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या NEP 2020 नुसार सुरु करण्याबाबत आणि संरचनेस मान्यता घेण्यात आलेली आहे परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार २०२३ या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर शिक्षणक्रम राबविण्यासाठी उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन यांच्याकडून शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/प्रा.क्र.०९/विशि-३ शिकाना दिनांक 16 मे 2023 पदव्युत्तर शिक्षणक्रमाची संरचना देण्यात आलेली आहे. या संरचनेत एखाद्या विशिष्ट विषयात प्रभुत्व प्राप्त करून अध्ययनार्थीला प्रथम वर्ष पूर्ण केल्यानंतर PG Diploma घेऊन बाहेर पडण्याची संधी उपलब्ध केलेली आहे. अनिवार्य अभ्यासक्रम, वैकल्पिक अभ्यासक्रम आणि संशोधन पद्धती समावेश आहे. त्याचप्रमाणे आंतरवासिता, क्षेत्रीय कार्य आणि संशोधन कार्याचा समावेश करण्यात आलेला आहे. वरील शासन निर्णयाचा आधार घेऊन एम.ए. शिक्षणशास्त्राच्या संरचनेत बदल करण्यात आलेला आहे. मा. कुलगुरूंची विद्वत परिषद अध्यक्ष म्हणून मान्यता घेण्यात आलेली आहे.

(58.4.2) **एम.ए. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम नाव बदल:** सत्र १ मध्ये शिक्षणशास्त्र मूलभूत मध्ये आणि सत्र २ मध्ये एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमात दोन अभ्यासक्रमांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. दोन अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रम विकसन समितीची बैठक घेण्यात आली त्यात अभ्यासक्रमांच्या नावात बदल सुचविण्यात आलेला आहे. पुढील प्रमाणे :-

| अ. | अगोदर मान्य अभ्यासक्रम नाव | सुधारित अभ्यासक्रम नाव |
|---|---|---|
| १. | शिक्षणशास्त्र मूलभूत | शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्त्वे |
| २. | ग्रंथालय आणि इ. ग्रंथालय | ग्रंथालय व अध्ययन संसाधने |
| ३. | विशेष समस्याग्रस्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन | विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना |

मार्गदर्शन

UGC व Distance Education Bureau च्या मार्गदर्शनानुसार स्वयं अध्यापन साहित्य २ श्रेयांकासाठी ६ घटक आणि ४ श्रेयांकासाठी १२ घटक सांगितलेले आहे. शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्वे आणि ग्रंथालय आणि अध्ययन संसाधने हे दोन अभ्यासक्रम प्रत्येकी २ श्रेयांकाचे आहेत. त्यात एकूण ६ घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. मा. कुलगुरूंची पाठ्यक्रम विकसन समिती आणि लेखक संपादक समितीला मान्यता घेऊन स्वयं अध्यापन साहित्य विकसित करण्यात येत आहे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन हा अभ्यासक्रम ४ श्रेयांकांचा आहे. त्यात एकूण १२ घटकांचा समावेश करावा लागणार आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील मार्गदर्शन व समुपदेशन या पदविका अभ्यासक्रम विशेष समस्याग्रस्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन हा अभ्यासक्रम विकसित करण्यात आलेला आहे. त्यात एकूण सहा घटक आहेत. विद्याशाखेतील सेंटर फॉर डिसअ‍ॅबिलीटी स्टडीजमध्ये बी.एड विशेष शिक्षण राबविण्यात येतो त्यातील विविध अभ्याक्रमातील सदर विषयाशी संबंधित घटकांचा समावेश करून आणि आवश्यकता असल्यास नवीन घटकांचे लेखन करून हा अभ्यासक्रम १२ घटकांचा विकसित करण्यात येणार आहे. त्यासही मा. कुलगुरूंनी विद्याशाखा परिषदेच्या मान्यतेच्या अधिक राहून मान्यता दिलेली आहे.

(58.4.3) **एम.ए शिक्षणशास्त्र प्रवेश पात्रता वाढ:** इतर विद्यापीठात एम.ए. शिक्षणशास्त्र प्रवेश पात्रता अटींमध्ये कोणत्याही विषयातील पदवीधर व्यक्तीस प्रवेश दिला जातो. य.च.म.मुक्त विद्यापीठ प्रवेश मा. कुलगुरूंनी दि. ०१/०८/२०२३ अंतर्गत संज्ञापन पत्राद्वारे पुढील प्रवेश अटींना मान्यता दिलेली आहे.

१. युजीसी मान्यताप्राप्त कोणत्याही विद्यापीठातील पदवीधारक व्यक्ती.

२. ललित कला शाखेतील पदवीधारक व्यक्ती आणि कला शिक्षक (A.M.) बी.एड समकक्ष व्यक्ती एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या प्रवेश व पात्रतेसाठी मान्यता द्यावी.

**(58.4.4) NEP २०२० नुसार एम.ए शिक्षणशास्त्र संपर्कसत्र आयोजन मान्यता:** NEP २०२० नुसार एम ए शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या संरचनेत बदल करण्यात आलेला आहे. UGC व DEB मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तात्विक आणि प्रात्यक्षिक कार्याच्या संमंत्रण तासिकांबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. अध्ययन आधार केंद्रांच्या शुल्कात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. अध्ययन आधार केंद्रामार्फत राबविल्या जाणाऱ्या संपर्क सत्राचे सविस्तर वेळापत्रक तयार करण्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्याबाबत चर्चा मान्यतेसाठी सादर.

**(58.4.5) NEP 2020 नुसार एम.ए शिक्षणशास्त्र मूल्यमापन योजना:** NEP 2020 आणि उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन यांच्याकडून पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनाबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहे. विद्यापीठात शिक्षणक्रमातील विविध घटकांच्या मूल्यमापनासंदर्भात दिनांक १२ सप्टेंबर २०२३ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यात विद्यापीठाच्या सर्व NEP 2020 प्रमाणे राबविण्यात येणाऱ्या पदव्युत्तर शिक्षणक्रमाची मूल्यमापन विभागाकडून विकसित करण्यात येणाऱ्या मूल्यमापन योजना विकसित करण्यात येणार आहे. एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या गरजेनुसार मूल्यमापन योजनेत आवश्यक तेथे

बदल करावे लागतील बदल करण्याचे अधिकार हे संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा ह्यांना देण्याबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**(58.4.6) एम.ए. शिक्षणशास्त्र सन २०२४ प्रवेश तुकडीसाठी विद्यार्थी संख्या निश्चितीबाबत...**

विद्यापीठातील इतर विद्याशाखांमध्ये पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी प्रति अध्ययन आधार केंद्रासाठी ६० उमेदवारांना प्रवेश देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी प्रति अध्ययन आधार केंद्र प्रवेश संख्या ६० करण्यास मान्यतेसाठी सादर.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर –**

१. उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन निर्णयानुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या सुधारित संरचनेस कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

२. शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्त्वे आणि ग्रंथालय व अध्ययन संसाधने या दोन अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रम विकसन समिती आणि लेखक संपादक समितीच्या कार्याला कार्योत्तर मान्यता देण्यात यावी. अपरिहार्य कारणास्तव लेखकाने लेखन करण्यास असमर्थता दर्शविल्यास लेखक बदलाचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात यावे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन या अभ्यासक्रमाच्या विकसन प्रक्रियेबाबत मा. कुलगुरूंनी आगामी विद्या परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

३. एम.ए शिक्षणशास्त्र प्रवेश पात्रता अटी कोणत्याही विषयातील पदवीधारक, आर्ट मास्टर (A.M) बी.एड समकक्ष, ललित कला पदवीधारक व्यक्ती B.F.A या प्रवेश अटी घेण्याबाबत कार्योत्तर मान्यता देण्यास व चर्चेसाठी सादर.

४. NEP 2020, UGC आणि DEB मार्गदर्शक तत्त्वानुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम संपर्क सत्र नियोजन व आयोजनामध्ये सविस्तर वेळापत्रकाचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यास मान्यता व चर्चेसाठी सादर.

५. NEP 2020 आणि उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त मागर्दर्शक तत्वानुसार एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन कार्यवाही योजना विकसनाचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यास मान्यता व चर्चेसाठी सादर.

६. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी प्रति अध्ययन आधार केंद्र प्रवेश संख्या ६० करण्यास मान्यतेसाठी सादर.

**(सहपत्र 5)**

**निर्णय-**

१. एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या सुधारित संरचनेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

२. शिक्षणशास्त्राची मूलभूत तत्वे, ग्रंथालय आणि अध्ययन संसाधने आणि विशेष गरजा असणा-या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन या अभ्यासक्रमाच्या पाठ्यक्रमास व लेखक संपादकास मान्यता देण्यात आली. आवश्यकतेनुसार जादा लेखक आणि संपादक घ्यावे लागल्यास त्याबाबतचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आले.

३. एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या प्रवेश पात्रतेत कोणत्याही विषयातील पदवीधारक, आर्ट

| | |
|---|---|
| | मास्टर (A.M.) बी.एड् समकक्ष, ललित कला पदवीधारक (B.F.A.) ह्या प्रवेश अटींना मान्यता देण्यात आली.<br>४. NEP 2020 UGC आणि DEB मार्गदर्शक तत्वानुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या संपर्क सत्र वेळापत्रक अंतीम करण्याचे अधिकारी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आले .<br>५. NEP 2020आणि उच्चशिक्षण महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या मूल्यमापन योजनेनुसार एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन योजनेत आवश्यक तेथे बदलाचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आले.<br>६. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. शिक्षणसशास्त्र शिक्षणक्रमासाठी प्रति अध्ययन आधार केंद्र कमाल प्रवेश संख्या ६० करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 58.5 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 5 (PGDEEDS शिक्षणक्रम)**<br>**PGDEEDS शिक्षणक्रम सत्र १ व सत्र २ पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक देणेबाबत....**<br>**टिपणी –**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि MKCL यांच्या संयुक्त विद्यमाने Post Graduate Diploma in e- Education in Digital Society (PGDEEDS) शिक्षणक्रमाचा पथदर्शक अभ्यास २०१८ मध्ये सुरु करण्यात आलेला होता. त्यास १६५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता. हा पथदर्शी अभ्यास असल्यामुळेविद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क घेण्यात आलेले नव्हते. हा शिक्षणक्रम एकूण ६४ श्रेयांकांच्या असून चार सत्रामध्ये विभाजन केलेला होता. प्रत्येक सत्र हे १६ श्रेयाकांचे होते. सत्रनिहाय अभ्यासक्रम पुढील प्रमाणे आहे. |

| Sr. No. | Sem I | Sem II | Sem III | Sem IV |
|---|---|---|---|---|
| 1. | ICT-BASED WORKER EDU221 | E-Learning Practitioner EDU225 | E-Learning Resource Developer A EDU229 | Techno-Pedagogue Practitioner B EDU233 |
| 2. | E-Culture Practitioner EDU 222 | E-Learning Specialist EDU 226 | E-Learning Resource Developer B EDU230 | Change make EDU234 |
| 3. | E-Culture Nurturer EDU223 | Evaluator EDU227 | Tech-Pedagogue Developer A EDU 231 | Practicing Place Development Project EDU235 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | Networker EDU224 | Action Researcher EDU228 | Action Research Part 1 EDU232 Project Part 1 | Action Research Project Part 2 EDU232 |
| Credit Point | 16 | 16 | 16 | 16 |

हा शिक्षणक्रम scenario based पद्धतीने पूर्णता online पद्धतीने राबविण्यात येत होता. प्राथमिक ते विद्यापीठीय स्तरावर कार्यरत शिक्षकांनी त्यास प्रवेश घेतलेला होता. विद्यार्थ्यांना ICT चे Skill नसल्यामुळे MKCL मार्फत ICT Based Worker एक अभ्यासक्रम विकसित करण्यात आला व तो सुरवातीला राबविण्यात आला. आणि सत्र १ आणि सत्र २ अनुक्रमे विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमाच्या भूमिकेच्या अभ्यासासाठी संदर्भांचा अभ्यास करून online पद्धतीने स्वाध्याय आणि प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावयाचे होते. त्यांना online पद्धतीने संमंत्रणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांना विशीष्ट भूमिका करण्यासाठी स्वतः संदर्भाचा शोध घेऊ अभ्यास करणे अडचणीचे ठरले. कोविड काळात विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. नोकरीच्या स्थळात झालेला बदल यामुळे ही विद्यार्थ्यांच्या गळतीत वाढ झाली. परंतु त्याही परिस्थितीत प्रथम सत्रातील २२ विद्यार्थ्यांनी आणि द्वितीय सत्रातील १५ अंतर्गत कार्य पूर्ण करून सत्राचा शेवटी घेण्यात येणारी संयुक्त मौखिक परीक्षा online पद्धतीने यशस्वीरित्या पूर्ण केलेली आहे. अशा दोन विद्यार्थ्यांनी गुणपत्रकाबाबत विनंती अर्ज दिलेले आहे. त्यांचे पत्र व कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचे यादीही सोबत जोडलेली आहे.

(सहपत्र 6)

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.....**

PGDEEDS शिक्षणक्रमच्या ज्या विद्यार्थ्यांनी सत्र १ किंवा सत्र २ किंवा सत्र १, २ यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहे. त्यांना त्या त्या सत्राचे गुणपत्रक देण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय-**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या सर्व सदस्यांनी एकमताने सदर विद्यार्थ्यांना गुणपत्रक देण्याबाबत मान्यता देण्यात आली. यासंदर्भात परीक्षा विभागाशी सविस्तर चर्चा करुन पुढील उचित कार्यवाही करावी असे सुचविण्यात आली.

58.6 **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 6 (सिलेज विकसन)**

**सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रमात नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करणेबाबत.....**

**टिपणी —**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू कै. प्रा. राम ताकवले ह्यांच्या मार्गदर्शनानुसार सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसनाचे कार्य शिक्षणशास्त्र विद्याशाखेत हाती घेण्यात आलेले आहे. त्यातील अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१. तंत्रज्ञानाधारे सिलेज विकसन
२. घटनादुरुस्ती आणि पंचायत राज संस्कृती
३. लघुउद्योग आणि संस्कृती विकसन

४. कृतीसंशोधन

दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी पाठ्यक्रम विकसन समितीची बैठक घेण्यात आली त्यात तज्ज्ञांच्या साहाय्याने पाठ्यक्रम विकसित करण्यात आला. अभ्यासक्रम १,२ च्या नावांमध्ये समितीने बदल सुचविलेले आहेत.

१. सिलेज विकास

२. घटनादुरुस्ती आणि पंचायत राज

पाठ्यक्रम विकसन समितीमध्ये अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी होते. पंचायत राज बाबत ग्रामीण जनतेध्ये जागरूकता आहे. या अभ्यासक्रमाला पर्यायी अभ्यासक्रम देण्यासाठी विद्यापीठाने ग्रामीण भागातील गरजांचा अभ्यास करून यात इतरही अभ्यासक्रम घेता येतील याबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार सत्र २०२२ या आर्थिक वर्षात सूक्ष्म संशोधन प्रकल्प घेण्यात आला. त्यातून ग्रामीण विकासाशी संबंधित पुढील 14 अभ्यासक्रमांचा समावेश असावा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

१) पाणी व्यवस्थापन
२) सेंद्रिय शेती
३) ग्रामीण शेतीपूरक उद्योग
४) गृहउद्योगातून महिला सक्षमीकरण
५) पर्यावरणपूरक जीवन शैली आणि शाश्वत विकास
६) लोकसहभागातून ज्ञानार्जन आणि ग्रामविकास
७) कुटुंब व समाज आरोग्य संवर्धन
८) स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ग्रामविकास
९) पशुपालन आणि दुग्धव्यवसाय
१०) अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा दैनंदिन जीवनात वापर
११) कृषी पर्यटन
१२) ग्रामविकासात तंत्रज्ञानाचा उपयोजन
१३) स्वयंपाक घरातील अन्नप्रक्रीयेमागील विज्ञान
१४) वनसंपदेपासून संरक्षण अर्थाजन

NEP 2020 नुसार Ability enhancement, skill enhancement कोर्सेससाठी अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर........**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत विकसित करण्यात येणाऱ्या सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रमात 14 अभ्यासक्रमांचा समावेश करण्यास मान्यता व चर्चेसाठी सादर .

**निर्णय-**

सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रमात वरील चौदा विषय टप्या टप्याने समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.

| | |
|---|---|
| 58.7 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 7 (शिक्षणक्रम पुनर्रनोंदणी शुल्क)**<br>**शिक्षणक्रम नोंदणी कालावधी संपल्यानंतर पुनर्रनोंदणी शुल्क आकारणेबाबत.**<br>**टिपणी —**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांच्या नोंदणी आणि पुनर्रनोंदणी कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. नोंदणी कालावधी संपल्यानंतर त्याचवर्षी वर्षी पुनर्नोंदणी कालावधी सुरु होतो. पुनर्नोंदणी ज्या शैक्षणिक वर्षात सुरु होते त्या वर्षाचे शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागते. विविध अपरिहार्य कारणास्तव विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमातील वेगवेगळ्या कृती अपूर्ण राहतात आणि ते शिक्षणक्रम पूर्ण करण्याची मागणी करतात. विद्यार्थ्यांचा विचार करता शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क न भरता त्याचे अपूर्ण राहिलेल्या कृतीनुसार शुल्क भरण्याबाबतची मांडणी पुढे केलेली आहे.<br>१) विद्यापीठामार्फत घेण्यात येणारी अंतिम परीक्षा अनुत्तीर्ण असल्यास पुनर्रनोंदणीच्या वर्षाचे फक्त विद्यापीठ शुल्क भरण्यास मान्यता देणेबाबत.<br>२) विद्यार्थ्याचे फक्त अंतर्गत कार्य (अध्ययन आधार केंद्राशी संबंधित) अपूर्ण असल्यास त्या त्या वर्षाचे अभ्यासकेंद्र शुल्क आणि विद्यापीठ शैक्षणिक शुल्क रु. २०००/- आणि त्या गुणपत्रक शुल्क रु. २००/-, पासिंग प्रमाणपत्र रु. २००/- आणि पदवी प्रमाणपत्र रु. ४००/- असे एकूण परीक्षा शुल्क म्हणून रु. ८००/- शुल्क भरण्यास मान्यता देणेबाबत.<br>३) विद्यार्थ्यांचे फक्त संशोधन कार्य अपूर्ण असल्यास आणि अभ्यासकेंद्र कार्यरत असल्यास अभ्यासकेंद्राचे संशोधन कार्याबाबत निर्धारित शुल्क आणि विद्यापीठ शुल्क रु. ५००० घेऊन त्यास एक वर्षाची मुदत देण्यात मान्यता देणेबाबत. अभ्यासकेंद्र बंद झालेले असल्यास विद्याशाखेतील अभ्यासकेंद्रवरील विद्यार्थी वर्ग करणे बाबत.<br>४) एम.ए., बी.एड. आणि बी.एड. विशेष शिक्षण संपर्कसत्र 75% उपस्थिती अनिवार्य आहे. उपस्थित 75% नसल्यास विद्यार्थ्यांचे अंतर्गत कार्य पूर्ण होत नाही. त्यामुळे त्याला अंतिम परीक्षा देता येत नाही. विद्यार्थ्यांची संपर्क सत्राची उपस्थिती आणि अंतर्गत कार्य पूर्ण करण्यासाठी प्रति दिन रु. ५०० (विभाजन विद्यापीठ शुल्क रु. ३०० आणि अभ्यासकेंद्र शुल्क रु. २०० घेऊन व उर्वरित कार्य पूर्ण व संपर्क सत्र 75% उपस्थिती करणेबाबत.<br>५) एम.ए शिक्षणशास्त्र, बी.एड, बी.एड विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांने अभ्यासक्रम बदलाबाबत मागणी केल्यास अतिरिक्त रु. 5000/-शुल्क भरून प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर नंतर एक महिन्याच्या आत भरल्यास विषय बदलास मान्यतेसाठी सादर.<br>६) विद्यार्थ्यांचा नोंदणी व पुनर्रनोंदणी कालावधी संपल्यानंतर विद्यार्थी अंतिम परीक्षा अनुत्तीर्ण किंवा दिलेली नसल्यास परीक्षा विभागाने त्या-त्या वेळी विशेष बाब म्हणून शुल्क निश्चित केल्यास ते स्वीकारण्यास मान्यता देणेबाबत.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.....**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांच्या नोंदणी व पुनर्रनोंदणी कालावधी संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अपूर्ण राहिलेल्या कृतीनुसार वरील १ ते ५ प्रमाणे शुल्क घेण्यात मान्यतेसाठी सादर .<br>**निर्णय-**<br>१) विद्यापीठामार्फत घेण्यात येणारी अंतिम परीक्षा अनुत्तीर्ण असल्यास पुनर्रनोंदणीच्या वर्षाचे फक्त विद्यापीठ शुल्क घेण्यास मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| | २) विद्यार्थ्यांचे फक्त अंतर्गत कार्य (अध्ययन आधार केंद्राशी संबंधित) अपूर्ण असल्यास त्या त्या वर्षाचे अभ्यासकेंद्र शुल्क आणि विद्यापीठ शैक्षणिक शुल्क रु. २००० आणि त्या त्या वर्षाचे परीक्षा शुल्क रु. ८००/- भरण्यास मान्यता देण्यात आली.<br>३) विद्यार्थ्यांचे फक्त संशोधन कार्य अपूर्ण असल्यास आणि अभ्यासकेंद्र कार्यरत असल्यास अभ्यासकेंद्राचे संशोधन कार्याबाबत निर्धारित शुल्क आणि विद्यापीठ शुल्क रु. ५००० घेऊन त्यास एक वर्षाची मुदत देण्यात मान्यता देण्यात आली. अभ्यासकेंद्र बंद झालेले असल्यास विद्याशाखेतील अभ्यासकेंद्रावर विद्यार्थी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.<br>४) एम.ए. शिक्षणशास्त्र, बी.एड. आणि बी.एड. विशेष शिक्षण संपर्कसत्र 75% उपस्थिती अनिवार्य आहे. उपस्थित 75% नसल्यास विद्यार्थ्यांचे अंतर्गत कार्य पूर्ण होत नाही. त्यामुळे त्याला अंतिम परीक्षा देता येत नाही. विद्यार्थ्यांची संपर्क सत्राची उपस्थिती आणि अंतर्गत कार्य पूर्ण करण्यासाठी प्रति दिन रु. ५०० (विभाजन विद्यापीठ शुल्क रु. ३०० आणि अभ्यासकेंद्र शुल्क रु. २०० घेऊन व उर्वरित कार्य पूर्ण व संपर्क सत्र 75% उपस्थिती करण्यास मान्यता देण्यात आली.<br>५) एम.ए शिक्षणशास्त्र, बी.एड, बी.एड विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांने अभ्यासक्रम बदलाबाबत मागणी केल्यास अतिरिक्त रु.5000/-शुल्क भरून प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर नंतर एक महिन्याच्या आत भरल्यास विषय बदलास मान्यता देण्यात आली.<br>6) विद्यार्थ्यांचा नोंदणी व पुनर्रनोंदणी कालावधी संपल्यानंतर विद्यार्थी अंतिम परीक्षा अनुत्तीर्ण किंवा दिलेली नसल्यास परीक्षा विभागाने त्या-त्या वेळी विशेष बाब म्हणून शुल्क निश्चित केल्यास ते स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली. |
| 58.8 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 8 (शिक्षणक्रम लेखक संपादक निश्चितबाबत)**<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखेत पुनरचना आणि नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रम लेखक संपादक निश्चितीबाबत.....**<br>**टिपणी –**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका, बालसंगोपन व रंजन शिक्षणक्रम ह्या शिक्षणक्रमांची पुनर्रचना करण्यात येत आहे. मार्गदर्शन व समुपदेशन पदविका, स्वयं-सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रमः प्रगत आणि सिलेज विकसन प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यास येत आहे. काही अपरिहार्य कारणास्तव लेखन वेळेत पूर्ण करून देत नाहीत अशा वेळी पर्यायी लेखक संपादकांची निवड करावी लागते.<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.....**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुनर्रचना आणि नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या लेखक संपादकांची कार्य वेळेत पूर्ण करून न दिल्यास नवीन लेखक संपादक घेण्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यास मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुनर्रचना आणि नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या लेखक संपादकांनी कार्य वेळेत पूर्ण करून न दिल्यास नवीन लेखक संपादक घेण्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आले. |

| | |
|---|---|
| 58.9 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 9**<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पूर्नरचित शिक्षणक्रमासाठी लेखक संपादकांची पेढी विकसित करणेबाबत..**<br>**टिपणी :**<br>NEP 2020 नुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम बदल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे NCTE 2024 अभ्यासक्रम आराखडा RCI मार्फत बी.एड् विशेष शिक्षण अभ्यासक्रम आराखडा 2024 मध्ये प्रसिध्द होणार आहे. त्यानुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमाची पुर्नरचना करुन त्यासंदर्भाने स्वयं अध्यापन साहित्य ऑडीओ व्हिडीओ तयार करावे लागतील. त्याचप्रमाणे विद्याशाखेमार्फत पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित करण्यात येणार आहे. या विविध अभ्यासक्रमासाठी लेखक संपादकांची आवश्यकता असणार आहे. त्यासाठी पेढी तयार करता येईल. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय-**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पूर्नरचित शिक्षणक्रमासाठी लेखक संपादकांची पेढी विकसित करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 58.10 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 10**<br>**"संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय", या पुरक अध्ययन पुस्तिकेचे विकसनास मान्यता देणे.**<br>**टिपणी :-**<br>भारतीय संविधानिक व लोकशाही मूल्यांबाबत भारतीय नागरिकांनी परिचित व साक्षर व्हावेत. संविधान अध्ययनार्थीच्या दैनिक वर्तनात दिसावे. यामुळेच मानवी मूल्याचे व राष्ट्राचे संवर्धन व उन्नयन होईल. म्हणून महाराष्ट्र शासनानी भारतीय संविधानिक व लोकशाही मूल्यांचा हा विधायक भाग अध्ययनार्थीसाठी सर्व शैक्षणिक संस्थामधून पूरक अध्ययनासाठी ठेवण्यासाठी सूचित केलेले आहे. त्याचा आशय पुढील प्रमाणे<br>१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्नाविधान सत्ता संकल्पना – लेखक डॉ. यशवंत मनोहर, नागपूर<br>२. भारतीय राज्यघटनेचा सरनामा – लेखक प्रा. विजयकुमार पाईकराव<br>३. सर्वांना "संविधान ओळख अनिवार्य" : क्रांतिकारी निर्णय - लेखक डॉ. यशवंत मनोहर, नागपूर<br>४. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे व मूलभूत अधिकार परस्परसंबंध आणीबाणीची तरतूद – लेखक प्रा. विजयकुमार पाईकराव<br>५. भारतीय संविधानातील धर्मनिरीपेक्षता संकल्पना – लेखक डॉ. यशवंत मनोहर, नागपूर<br>६. मूलभूत हक्क : निसर्गाचा कायदा – लेखक प्रा. विजयकुमार पाईकराव<br>संविधानिक लोकशाही मूल्यांचा परिचय, या पुरक अध्ययन पुस्तिकेचे विकसनास चर्चा व मान्यतेसाठी सादर. |

निर्णय-

या विषयाबाबत पाठ्यक्रम विकसन समिती स्थापन करण्यात यावी. ह्या समितीकडून ह्या विषयासंदर्भात समाविष्ठ करावयाचे घटक निश्चित करण्यात यावेत. असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

58.11 **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 11 (बी.एड. विशेष शिक्षण)**

(58.11.1) **बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२३-२४ अर्थशीर्ष मान्य करण्यासंदर्भात....**

सन २०२३-२६ बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या तुकडीसाठी एकूण शुल्क रु. ४६५१०/- आकारले जाणार आहे. या शुल्कातून ४०% **(रु. १५६८०/-)** अभ्यासकेंद्राला आणि ६०% **(रु.३०८३०/- )** इतके शुल्क विद्यापीठाला वर्गीकृत केली जाणार आहे. अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रांनी कसे वापरावे? यासंदर्भात अभ्यासकेंद्र शुल्क अर्थशीर्ष निश्चित केलेले आहे. या सर्व बाबीं सहपत्र मध्ये सोबत जोडण्यात आल्या आहेत. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

(58.11.2) **बी.एड. विशेष शिक्षणक्रम (P21) संपूर्ण शिक्षणक्रमाची प्रवेश प्रक्रिया आणि अंमलबजावणी नियमा बाबत...**

बी.एड. विशेष शिक्षण (P21) शिक्षणक्रमाची ह्या RCI (२०२१) मार्गदर्शक तत्वानुसार सन २०२३-२६ च्या तुकडीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेणे अपेक्षित होते. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे प्रवेश प्रक्रिया न घेता मुलाखत घेण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद अध्यक्षांच्या वतीने तात्कालिन संचालकाची मान्यता घेण्यात आलेली होती. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...

(58.11.3) **सेंटर फॉर डीसॅबीलिटी स्टडीज कक्षाचे मराठी नाव निश्चीत करणेबाबत...**

विद्यापीठात सन २०२० मध्ये सेंटर फॉर डीसॅबीलिटी स्टडीज स्थापन केलेले आहे. त्या कक्षाचे नाव हे इंग्रजी मध्येच आहे. तर कक्षाचे दोन्ही स्वरुपात नाव असावे असे वाटते. म्हणून ह्या कक्षाचे मराठीतील नाव हे 'दिव्यांग अध्ययन केंद्र' ह्या नावाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्याचप्रमाणे हे नाव प्रचलित करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर....

(58.11.4) **अभ्यासकेंद्राने संबंधित शाळेशी सामंजस्य करार करणेबाबत...**

बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्ली यांचेशी विद्यापीठाने सामंजस्य करार केलेला आहे. RCI च्या नियमाप्रमाणे मुख्यालयातील अभ्यासकेंद्राने प्रशिक्षणर्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबंधित शाळेशी सामंजस्य करार करणे बंधनकारक केलेले आहे. मुख्यालयात सद्यस्थितीत श्रवणबाधित, बौद्धिक अक्षमता आणि सन २०२३-२४ च्या तुकडीपासून दृष्टीबाधित प्रवर्गासाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तरी मुख्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचे शिक्षणक्रमाशी संबधित प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबधित शाळेशी सामंजस्य करार करावयाचे आहेत. संबधित शाळेला प्रती विद्यार्थी प्रती सत्र रु.४००/- इतके मानधन दिल्यास शाळेकडून सहकार्य मिळेल असे वाटते. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चेसाठी मान्यतेसाठी सादर...

(58.11.5) **नवीन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणे बाबत...**

- सन २०११ च्या Census, नुसार भारतात 121 कोटी लोकसंख्येपैकी 2.68 कोटी लोक 'अपंग' आहेत जे एकूण लोकसंख्येच्या 2.21% आहे. ह्या दिव्यांगाचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांचे दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान आणि हस्तक्षेपण होणे अत्यावश्यक असते. काही दिव्यांगत्व हे पटकन लक्षात येणारे तर काही दिव्यांगत्व लपलेले म्हणून ओळखले जाते. जसे. श्रवण बाधिता, अध्ययन अक्षमता, ADHD (अति चंचल) अशा काही प्रकारचे दिव्यांगत्व पालकांच्या लवकर लक्षात येत नाही. म्हणून विद्यापीठ आणि डॉ. अंजली मॉरीस फौंडेशन संस्था पुणे यांचेशी सामंजस्य करार करून विद्यापीठामार्फत **'अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** या नावाने सुरु करू इच्छितो. तरी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) नुसार किमान २० श्रेयांक आणि ६ महिन्याच्या कालावधीसाठी विकसित करावयाचा आहे.
- भारताचे मा. पंतप्रधानानी सन २०१५ पासून संपूर्ण भारतभर सुगमय भारत अभियानाची सुरुवात केली आहे. त्या अनुषंगाने दिव्यांगाच्या गरजेनुसार सुग्म्यता उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. शिक्षणाच्या दृष्टीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षकांना श्रवण बाधित विद्यार्थ्यांसोबत संप्रेषणाबाबतच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अडचणी येतात. म्हणूनच श्रवण बाधित विद्यार्थ्यांच्या गरजा समजून त्या पूर्ण करण्यासाठी शिक्षकांसाठी **'मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** या नावाने सुरु करू इच्छितो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) नुसार किमान २० श्रेयांक आणि ६ महिन्याच्या कालावधीसाठी विकसित करावयाचा आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चेसाठी व मान्यतेसाठी सादर...

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर -**

१. सन २०२३-२६ बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या तुकडीसाठी शुल्कातून ४०% अभ्यासकेंद्राला आणि ६०% शुल्क विद्यापीठाला वर्गीकृत करण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

२. सन २०२३-२६ च्या तुकडीसाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेणे अपेक्षित होते. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे प्रवेश प्रक्रिया न घेता मुलाखत घेण्यासाठी कार्योत्तर मान्यता द्यावी.

३. विद्यापीठात सन २०२० मध्ये सेंटर फॉर डीसँबीलिटी स्टडीज स्थापन केलेले आहे. कक्षाचे नाव हे इंग्रजी मध्येच आहे. तर कक्षाचे दोन्ही स्वरुपात नाव असावे असे वाटते. म्हणून ह्या कक्षाचे मराठीतील नाव हे **'दिव्यांग अध्ययन केंद्र'** ह्या नावाची अंमलबजावणी करण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

४. RCI च्या नियमाप्रमाणे मुख्यालयातील अभ्यासकेंद्राने प्रशिक्षणार्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबंधित शाळेशी सामंजस्य करार करण्यास कार्योत्तर मान्यता द्यावी.

५. **'अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** व **'मूलभूत भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** या नावाने सुरु करू इच्छितो. त्यास मान्यता द्यावी.

| | |
|---|---|
| | **निर्णय-**<br>१. विद्यापीठाबाहेरील अभ्यासकेंद्रासाठी खर्च विभागणीस मान्यता देण्यात आली.सेंटर फॉर डिसॲबिलीटीतर्फे चालविण्यात येणा-या केंद्राच्या खर्चाबाबत विद्यापीठातील इतर विद्याशाखेतील अभ्यासकेंद्राचा तुलनात्मक अभ्यास करून उचित कार्यवाहीचे अधिकार संचालकांना देण्यात आले.<br>२. बी.एड. विशेष शिक्षण (P21) शिक्षणक्रमाची ह्या RCI (२०२१) मार्गदर्शक तत्वानुसार सन २०२३-२६ तुकडीच्या प्रवेशासाठी मुलाखत घेण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद अध्यक्षांच्या वतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्याला शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेत कार्योत्तर मान्यता देण्यात आली.<br>३. विद्यापीठात सन २०२० मध्ये सेंटर फॉर डीसँबीलिटी स्टडीज स्थापन केलेले आहे. त्या कक्षाचे मराठीतील नाव हे 'दिव्यांग अध्ययन केंद्र' हे प्रचलित करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषदेत मान्यता देण्यात आली.<br>४. RCI च्या नियमाप्रमाणे मुख्यालयातील अभ्यासकेंद्राने प्रशिक्षाणार्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबंधित शाळेशी सामंजस्य करार करुन संबंधित शाळेला प्रती विद्यार्थी प्रती सत्र रु.४००/- इतके मानधन देण्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेने देण्यात आली.<br>५. **'अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** किमान २० श्रेयांक आणि कालावधी 6 महिने विकसित करण्यास मान्यता देण्यात आली.<br>६. **सांकेतिक भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम'** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) नुसार किमान २० श्रेयांक आणि ६ साठी विकसित करण्यासाठी मान्यता देण्यात आली. |
| 58.12 | **विषय क्र. बी.-1 / एफ-177 / 2023/ 12**<br>**AM पात्रता धारण करणा-या अध्यनार्थीस DSM शिक्षणक्रमास प्रवेश देणे बाबत...**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम महाराष्ट्रातील विविध केंद्रावरून कार्यान्वित केला जातो. सदरील शिक्षणक्रमाची सद्याची प्रवेश पात्रता खालीलप्रमाणे आहे.<br>१) युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठ पदवीधर व्यक्ती किंवा<br>२) मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक असे नियुक्तपत्र असलेली व्यक्ती<br>मात्र AM पात्रताधारण करणारे शिक्षक देखील या शिक्षणक्रमासाठी प्रवेशाची मागणी करतात. AM हा शिक्षणक्रम युजीसी अंतर्गत येत नसून तो DIRECTORATE OF ART : MAHARASHTR STATE या अंतर्गत येतो. त्यामुळे या शिक्षकांना या शिक्षणक्रमासाठी प्रवेश देण्यात येत नाही. श्री. पाटील सचिन ह्यांनी प्रवेशाबाबत मागणी केलेली आहे ते 10 वी नंतर तीन वर्षात 1997 साली AM झालेले आहेत.<br>परंतु शासनाकडून या AM प्राप्त शिक्षकांना Graduate Teachers Category Scale दिली जात आहे. त्यामुळे हे शिक्षक या DSM शिक्षणक्रमास प्रवेशासाठी अर्ज करतात. त्यामुळे आपणास विनंती की, AM पात्रता धारण करणाऱ्या शिक्षकांना शालेय व्यवस्थापन पदविका |

| | |
|---|---|
| | शिक्षणक्रमासाठी प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून मान्यता देण्यासाठी मा. कुलगुरुंकडे प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. त्यांनी विद्या परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून विद्यापरिषदेच्या वतीने मान्य केलेले आहे. विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर... (सहपत्र 10)<br><br>निर्णय-<br>AM पात्रता धारक करणा-या अध्ययनार्थीस DSM शिक्षणक्रमास प्रवेश देणेबाबत चर्चा करुन सर्वानुमते अमान्य करण्यात आले. |

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यता आले.

प्रा.विजयकुमार पाईकराव,
सचिव,शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद

प्रा.संजीवनी महाले,
अध्यक्ष,शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद

मान्य/ अमान्य

मान्य

मा.कुलगुरू ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर...........

School Council Education